**कृपया प्रसिध्दीसाठी** **25 जुलै 2012**

## भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी पुणे येथे पत्रकार परिषदेत 25 जुलै 2012 रोजी वितरीत केलेले निवेदन

***कुष्ठपीडितांच्या समस्यांसाठी मानवी हक्क प्रकोष्ठाची स्थापना***

**पुणे,बुधवार:** कुष्ठपीडितांच्या समस्या गेली पाच वर्षे सातत्याने राष्ट्रीय पातळीवर संसद, पंतप्रधान आणि राष्ट्रपती तसेच राज्यपातळीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासमोर मांडल्यानंतरही समाधानकारक तोडगा न निघाल्यामुळे इंटरनॅशनल लेप्रसी युनिअनच्यावतीने (आयएलयु) आयोजित परिषदेमध्ये 'कुष्ठपीडित मानवी हक्क प्रकोष्ठ' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी ही माहिती दिली. ते आज पुणे येथे आयएलयुने आयोजित केलेल्या तीन दिवसांच्या परिषदेच्या उद्घाटनानंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. पत्रकार परिषदेला आयएलयुचे अध्यक्ष डॉ. शरद्चंद्र गोखलेही उपस्थित होते.

कुष्ठपीडितांच्या समस्यासंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''कुष्ठपीडितांच्या प्रातिनिधिक शिष्टमंडळाने गेल्या महिन्यात 15 जून रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांची, तर मुंबईत 20 जून रोजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. तत्पूर्वी राज्यसभेला 5 डिसेंबर 2007 रोजी विनंती-अर्ज सादर करुन चार वर्षे संसदेत आणि केंद्र सरकारात तर 6 ऑगस्ट 2008 रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्याशी प्रत्यक्ष पाठपुरावा करुन चर्चा केली. तथापि कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. दरम्यान राज्यसभेत 13 मार्च 2012 रोजी आरोग्य मंत्र्यांनी एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरात सांगितल्याप्रमाणे वर्ष 2010 मध्ये जगात 2,28,474 नवे कुष्ठरुग्ण आढळले त्यापैकी 1,26,800 म्हणजेच 55.5 टक्के कुष्ठरुग्ण भारतातील आहेत. या परिस्थितीत केंद्र सरकारने तसेच महाराष्ट्र सरकारने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन कार्यक्षमतेने परिणामकारक उपाय योजले नाहीत तर समस्या अधिकच उग्र रुप धारण करेल.''

''कुष्ठपीडितांच्या शरीराला कुष्ठरोगामुळे जशा संवेदना होत नाहीत तशीच संवेदनहीनतेची परिस्थिती केंद्र सरकारची तसेच महाराष्ट्र सरकारची झाली आहे. त्यावर उपाय म्हणून मानवी हक्क आयोगाकडे कुष्ठपीडितांची सामुदायिक तसेच वैयक्तिक गा-हाणी मांडण्यासाठी आयएलयुच्यावतीने 'कुष्ठपीडित मानवी हक्क प्रकोष्ठ' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रकोष्ठाच्या पदाधिका-यांची नावे तीन दिवस चालणा-या परिषदेच्याशेवटी घोषित करण्यात येतील. गेल्या काही महिन्यात आयएलयुतर्फे 64 अर्ज मानीव हक्क आयोगाकडे करण्यात आले होते त्यापैकी 90 टक्के प्रकरणी गा-हाणी सुटण्याचे यश मिळाले आहे,'' असेही श्री. राम नाईक म्हणाले.

ज्या प्रमुख 14 मागण्या केंद्र आणि राज्य सरकार यांच्याकडे प्रलंबित आहेत त्या पुढील प्रमाणे आहेतः- 1)कुष्ठपीडितांचे सामाजिक-आर्थिक सर्वांगिण सशक्तीकरण करण्यासाठी योजना तयार करणे. 2)राज्यसभेच्या विनंती अर्जात नमुद केलेल्या 16 विविध कायद्यांमध्ये परिवर्तन करणे. 3) कुष्ठपीडितांचा उदरनिर्वाह भत्ता प्रति महिना रु.2000/- पर्यंत वाढविणे व सर्व राज्यांमध्ये समान निर्वाह भत्ता देणे. 4)दारिद्र्य रेषेखालील गरीबांना व अपंगांना मिळणा-या सर्व आर्थिक व सामाजिक सवलती कुष्ठपीडितांनाही देणे. 5) ज्या ठिकाणी कुष्ठपीडितांच्या वसाहती आहेत त्या जमिनी त्यांच्या नावे करुन 7/12 वर तसा उल्लेख करणे तसेच त्यांचे पुनर्वसन करणे. 6) कुष्ठपीडितांच्या वसाहतींना सर्व नागरी सुविधा देणे. 7) कुष्ठपीडितांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय करणे व त्यासाठी त्यांना शिष्यवृत्त्या देणे. 8) कुष्ठपीडितांना स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे. 9) कुष्ठपीडितांच्या सुशिक्षित मुला-मुलींना शासकीय सेवेत सामावून घेणे तसेच त्यांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी 75टक्के सवलत देणे. 10) कुष्ठपीडितांच्या उत्पादनांवरील व्हॅट रद्द करणे. 11) कुष्ठरुग्णात वाढ झाली किंवा काय यासंबंधी देशभरात नव्याने सर्वेक्षण करणे. 12) कुष्ठसेवेमध्ये कुष्ठपीडितांचा सहभाग वाढावा यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे. 13) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्य व जिल्हा-स्तरीय समित्यांवर कुष्ठपीडितांना प्रतिनिधित्व देणे, तसेच राष्ट्रीय पुनर्वसन मंडळावरही कुष्ठपीडितांना स्थान देणे. 14) महाराष्ट्रात कुष्ठपीडित पुनर्वसन समिती गेली 12 वर्षे अस्तित्वात नाही, ती समिती गठीत करुन त्यामध्ये महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या दोन सदस्यांचा समावेश करणे, जेणेकरुन कुष्ठपीडितांच्या समस्या सोडविण्याचे कार्य सुकर होईल.

**(कार्यालय सचिव)**